स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेतंर्गत इतिहास विषयातील
पीएच.डी. (विद्यावाचस्पती) साठी सादर
करावयाचा शोधप्रबंधाचा
संक्षिप्त आराखडा.

शीर्षक

सहकार महर्षी तात्यासाहेब कोरे व्यक्ती आणि जीवनकार्य (१९१७ ते १९९४)

संशोधक

प्रा अजित एकनाथ पाटील

एम.ए.एम.एड, सेट.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. नरेंद्र बी. देशमुख

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभागप्रमुख,
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय,
बाभळगाव ता. लातूर, जि. लातूर.

संशोधन केंद्र
ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

सन २०२१–२२

सहकार महर्षी तात्यासाहेब कोरे व्यक्ती आणि जीवनकार्य
(१९१७ – १९९४)

- प्रस्तावना
- संशोधन विषयाचे महत्व
- संशोधनाची उद्दिष्टे
- संशोधनाची व्याप्ती व मर्यादा
- संशोधनाची गृहितके
- संशोधन पध्दती
- संशोधनाची साधने
- संशोधन प्रकरणांची विभागणी
- प्रकरण पहिले – प्रास्ताविक आणि सहकार चळवळीची पार्श्वभूमी
- प्रकरण दुसरे – संशोधन पद्धती
- प्रकरण तिसरे – तात्यासाहेब कोरेंचे प्रारंभिक जीवन
- प्रकरण चौथे – तात्यासाहेब कोरेंची सहकारातील जडण घडण
- प्रकरण पाचवे –तात्यासाहेब कोरेंनी वारणा खोऱ्याचा केलेला औद्योगिक विकास
- प्रकरण सहावे– तात्यासाहेब कोरे आणि वारणा खोऱ्याचा सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास
- प्रकरण सातवे– उपसंहार, परिशिष्टे, छायाचित्रे, संदर्भ ग्रंथ सूची, प्राथमिक साधने, दुय्यम साधने.
- संदर्भ ग्रंथ सुची

प्रस्तावना–

भारत हा देश कृषिप्रधान असल्याने समाज हा शेतीवर अवलंबून आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खेडी स्वयंपूर्ण होण्यासाठी आधुनिक काळात कृषिपूरक उद्योगांना सहकाराची जोड देण्यात आली. भारतात सहकारी संस्थाविषय कायदा– १९०४ प्रथम झाला. सहकारामुळे खेड्यांचा विकास होण्यास मदत झाली. साखर कारखाने, शैक्षणिक संस्था यामुळे रोजगार निर्मिती व ग्रामीण भागात शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्या. विकासाच्या प्रयत्नांना साथ देण्यासाठी ग्रामीण भागातील अनेक युवक पुढे येवू लागले आणि महाराष्ट्राच्या विकासास त्यांनी हातभार लावला. विसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनावर ज्यांनी सहकाराच्या माध्यमातून कर्तृत्वाचा ठसा उमटविला. त्यांच्यामध्ये विठ्ठलराव विखे पाटील, शंकरराव कोल्हे, कराडचे यशवंतराव चव्हाण, नांदेडचे शंकरराव चव्हाण, सांगलीचे वसंतदादा पाटील, अकलूजचे शंकरराव मोहिते– पाटील, कोल्हापूरचे रत्नाप्पा कुंभार, तात्यासाहेब कोरे इ. अशा अनेक व्यक्तींचे योगदान महत्वाचे मानले जाते. सर्व नेत्यांनी सहकाराच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या पर्यायाने खेड्यांचा विकास साधून ग्रामीण जीवन सुधारण्यास मदत केली.

सहकाराच्या माध्यमातून कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा विकास साधणारे असे एक उमेद व्यक्तीमत्व म्हणजे तात्यासाहेब कोरे होय. तात्यासाहेब हे स्वत: च्या अंगच्या गुणांनी कर्तृत्वाने आणि प्रयत्नाने तसेच सर्वसामान्यांबद्दल असणाऱ्या अस्थेमुळेच सहकार क्षेत्रात एक उत्तुंग भरारी घेवू शकले. समाजातील आर्थिक विषमता व दारिद्र्य दूर करण्याचा प्रयत्न केला. सर्वांना रोजगार मिळावा. सर्वाना सर्व प्रकारच्या शिक्षणाच्या संधी मिळाल्या पाहिजेत खेड्यातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी यासाठी वारणानगर येथे साखर कारखाना, महाविद्यालये, दूध उत्पादक संघ, विविध उद्योग समूहाच्या माध्यमातून समाजहित साधण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

अल्पभूधारक शेतकरी आणि जिरायती शेती करणारा सामान्य माणूस सहकारात कसा मोठा होईल याचा सतत विचार तात्यासाहेब करतं. सामान्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी तात्यासाहेबांनी सहकार चळवळ वाढविली आणि सहकाराचे नेतृत्व

केले. तात्यासाहेब स्वकर्तृत्वावर मोठी भरारी घेत असताना अनेक अडथळे आले. परंतु स्वत:ची गुणवत्ता, ज्ञान, आत्मविश्वास, प्रचंड ध्येयवाद व अथक परिश्रम या गुणांच्या जोरावर त्यांनी मोठी झेप घेतली. प्रारंभीच्या काळात सहाकाराकडे ओढा असणाऱ्या तात्यासाहेबांनी आपले व्यक्तिमत्व जाणीवपूर्वक घडविण्याचा प्रयत्न केला.

ज्यांच्या पासून नवे काहीतरी शिकता येईल अशा व्यक्तींच्या सहवासात ते राहिले यशवंतराव चव्हाण, रत्नाप्पा कुंभार, नानासाहेब गोरे, डॉ. धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता या थोर व्यक्तींचा सहवास त्यांना लाभला. त्यातूनच त्यांचे व्यक्तीमत्व घडत गेले. नेतृत्व फुलत गेले. आज सर्वजण त्यांच्या उत्तुंग नेतृत्वाकडे आदराने आणि आदर्श म्हणून पाहतात.

एकमेकां सहाय्य करू । अवघे चि धरू सुपंथा ।

या उक्तीप्रमाणे वारणा विविध उद्योग शैक्षणिक समूहाच्या माध्यमातून तात्यासाहेब कोरेंनी आपल्या कार्यक्षमतेने सहकाराचा एक आदर्श नमुना संपूर्ण भारतापुढे निर्माण केला आहे. आणि या वारणा खोऱ्याच्या विकासासाठीचे उत्तम नेतृत्व तात्यासाहेब कोरे यांनी केले.

तात्यासाहेब कोरे यांच्या सामाजिक, शैक्षणिक, सहकार या क्षेत्रातील कार्यावर प्रकाश टाकणे या सर्व क्षेत्रात त्यांच्या योगदानामुळे झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे आवश्यक वाटते. म्हणून सहकार महर्षी तात्यासाहेब कोरे व्यक्ती आणि जीवन कार्य (१९१७- १९९४) हा विषय पी. एच. डी. च्या संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाचे महत्त्व :

भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि महाराष्ट्राने ही मोकळा श्वास घेतला. ग्रामीण नेतृत्व आणि बहुजन नेतृत्व ही विशेषत्वाने पुढे येवू लागले. हे नेतृत्व आणि सहकार चळवळी परस्परांना पूरक ठरल्या. या दोन्ही गोष्टींतून महाराष्ट्राची वाटचाल प्रगतीच्या दिशेने सुरू झाली.

महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळाच्या पहिल्या दशकात परिवर्तनाची जबाबदारी ग्रामीण नेतृत्वावर येवून पडली. महाराष्ट्रात ग्रामीण नेतृत्त्वाचा विकासात मोठा वाटा आहे. त्यापैकीच तात्यासाहेब कोरे एक होय. ज्यांनी सहकाराची कास धरून

वारणेच्या खोऱ्यातील जवळपास ८० गावांमध्ये विकासाची गंगा नेली ती वारणा विविध उद्योग व शैक्षणिक समूहाच्या माध्यमातून यामध्ये वारणा सहकारी साखर कारखाना, वारणानगर, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, वारणा सहकारी दूध उत्पादक संघ लि. अमृतनगर, अभियांत्रिकी महाविद्यालय, फार्मसी महाविद्यालय असा मोठा वटवृक्ष तात्यासाहेबांनी उभा केला तो सर्वसामान्यांचे हित पाहण्यासाठी होय.

सहकाराचे मुलतत्त्व सहकाराद्वारे कल्याणकारी लोकराज्य निर्माण करणे हे आहे. सहकारात लोकशाही व समानतेला प्राधान्य आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील या युवकाने १९३० च्या दशकात सहकाराद्वारे कल्याणकारी लोकराज्याचे स्वप्न पाहिले आणि १९७० च्या दशकापर्यंत पूर्ण ही केले. कोल्हापूर आणि वारणा खोऱ्याच्या विकासात तात्यासाहेब कोरेंचे स्थान अढळ आहे. या सर्व संस्थांमुळे आणि तात्यासाहेबांच्या कार्याने कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा विकास झाला. विशेषत: पन्हाळा तालुका, हातकणंगले तालुका, शाहूवाडी तालुक्याचा व करवीर तालुक्याचा काही भाग, सांगली जिल्ह्यातील वाळवा व शिराळा तालुक्याचा काही भाग विकसित होण्यास मदत झाली.

तात्यासाहेबांनी केलेल्या कार्याचा परिचय भावी पिढीला व्हावा आणि यातून प्रेरणा घेवून भारत बलशाली बनविण्यासाठी असे ध्येयाने प्रेरीत समाजाचे स्वप्न पाहणारे तरूण घडावेत यासाठीच हे संशोधन महत्त्वाचे वाटते. तात्यासाहेब कोरे व्यक्ती व जीवनकार्य असे यापूर्वी संशोधन झाले नसल्याने एका दुर्लक्षित पण महत्त्वाच्या विषयावर प्रकाश टाकणे शक्य होईल. या संशोधनातून नवसमाजाला चेतना देणारी सहकाराची वाटचाल आणि दैदिप्यमान प्रगती ही माहिती व्हावी हा ही संशोधनाचा हेतू आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

संशोधन विषय निश्चित केल्यानंतर संशोधन कार्याचे उद्देश निश्चित करणे आवश्यक ठरते. ज्या ऐतिहासिक पार्श्वभूमीने संशोधन करण्यास जाणीव व चेतना निर्माण केली, या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन करण्यासाठी प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे-

१) तात्यासाहेब कोरे यांचे जीवन व कार्य यांचा सहकार चळवळीच्या संदर्भाने अभ्यास करणे.

२) तात्यासाहेब कोरे यांचे विविध उद्योग व शैक्षणिक समूह स्थापना ते यशस्वी वाटचालीचा अभ्यास करणे.

३) भावी पिढीला सहकारी महर्षी तात्यासाहेब कोरे यांच्या कार्याची जाणीव करून देणे.

४) वारणा विभागातील वारणा सहकारी उद्योग व शिक्षण संस्थांचे कालक्रमानुसार ऐतिहासिक महत्त्व समजून घेणे.

५) तात्यासाहेब कोरेंनी स्थापन केलेल्या वारणा उद्योग समूहाच्या माध्यमातून झालेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक विकासाचा आढावा घेणे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

१) महाराष्ट्रातील ग्रामीण नेतृत्वाचा उदय व सहकार चळवळीचा उदय याची माहिती प्रस्तुत प्रबंधात देण्यात येणार आहे.

२) तात्यासाहेब कोरे व्यक्ती आणि जीवन कार्य या संदर्भाने संशोधनाची कालमर्यादा २० वे शतक व २१ व्या शतकाची पहिली दोन दशके ही आहे.

३) तात्यासाहेब कोरे यांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक सहकार क्षेत्रातील कार्याचा सूक्ष्म पद्धतीने अभ्यास करण्यात येणार आहे.

४) तात्यासाहेब कोरे यांचा उद्योग समूह आणि वारणा खोऱ्याचा आर्थिक विकासाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

५) सदर संशोधन हे तात्यासाहेब कोरे व्यक्ती व जीवन कार्य तसेच त्यांची सहकारातील भूमिका पुरते मर्यादित आहे.

गृहितके :

संशोधनासाठी एखादा विषय निश्चित केल्यानंतर त्या विषयाच्या संदर्भात काही अनुमान किंवा संभाव्य उत्तरे मांडावी लागतात, या संभाव्य उत्तरे आणि अनुमानामुळे संशोधक आपले लक्ष काही निश्चित व आवश्यक तथ्यांवर केंद्रीत करतो. त्यामुळे संशोधनाला निश्चित दिशा मिळते. या संभाव्य उत्तरांना गृहीत कृत्ये म्हणतात.

१) महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात सहकार चळवळ विकसित झाली त्या चळवळीने महाराष्ट्राच्या विकासाला हातभार लावला.

२) महाराष्ट्रातील विशेषत: कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील सहकार चळवळीत तात्यासाहेब कोरे यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. त्यांच्या कार्याचे स्वरूप व्यापक व विधायक होते.

३) तात्यासाहेब कोरेंच्या सहकारातील योगदानाने वारणा खोऱ्याचा पायाभूत विकास झाला.

४) सहकार चळवळीमुळे ग्रामीण भागाच्या विकासास आर्थिक हातभार लागला.

५) महाराष्ट्रातील सहकार चळवळीत तात्यासाहेब कोरे यांचे योगदान महत्त्वाचे होते.

६) तात्यासाहेब कोरे यांचे सहकारातील कार्य प्रकाशात आणणे.

संशोधन साधने :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक **प्राथमिक साधनांमध्ये** तात्यासाहेब कोरे यांचे आत्मचरित्र मी एक कार्यकर्ता तसेच त्यांनी स्थापन केलेल्या विविध उद्योग व शैक्षणिक समूहाच्या संस्थांचे प्रोसेडिंग, स्मरणिका यांचा वापर करणार आहे. तात्यासाहेब कोरेंच्या कार्यात सहभागी व्यक्ती, संस्थांच्या मुलाखती घेणे आवश्यकता वाटते म्हणून संशोधनासाठी मुलाखती या अनुसूचीचा वापर करण्यात येणार आहे.

दुय्यम साधनांमध्ये समकालीन वृत्तपत्रीय लेखन, सहकार चळवळी संदर्भाने ग्रंथ व अन्य महत्त्वाचे ग्रंथ यांचा वापर करणार आहे. मौखिक इतिहास पद्धतीचा वापर ही संशोधक करणार आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने वेगवेगळ्या संशोधन पद्धतीचा अभ्यास करून ऐतिहासिक संशोधन पद्धती आणि वर्णनात्मक संशोधन पद्धती या दोन पद्धतींची निवड केली आहे.

संशोधन प्रकरणांची मांडणी खालीलप्रमाणे करण्यात येणार आहे.

१. प्रकरण पहिले – प्रास्ताविक आणि सहकार चळवळीची पार्श्वभूमी
२. प्रकरण दुसरे – संशोधन पद्धती
३. प्रकरण तिसरे – तात्यासाहेब कोरेंचे प्रारंभिक जीवन
४. प्रकरण चौथे – तात्यासाहेब कोरेंची सहकारातील जडणघडण
५. प्रकरण पाचवे– तात्यासाहेब कोरेनी वारणा खोऱ्याचा केलेला औद्योगिक विकास
६. प्रकरण सहावे– तात्यासाहेब कोरे आणि वारणा खोऱ्याचा सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास
७. प्रकरण सातवे– उपसंहार, परिशिष्टे, छायाचित्रे, संदर्भ ग्रंथ सूची, प्राथमिक साधने, दुय्यम साधने.

प्रकरण मांडणी

संशोधन प्रबंध खालीलप्रमाणे सात प्रकरणामध्ये मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले– प्रास्ताविक आणि सहकार चळवळीची पार्श्वभूमी

संशोधन विषयाची निवड का करण्यात आली आहे. विषयाचे महत्त्व काय आहे. विषयाची स्वरूप व व्याप्ती स्पष्ट केलेली आहे. संशोधन उद्दिष्टे यांची मांडणी करण्यात येणार आहे. संशोधन पद्धती व कागदपत्रे व तत्कालीन माहितीचा आधार या

विषयी स्पष्ट उल्लेख करण्यात येणार आहे. वरील संशोधन विषयाच्या अनुषंगाने सात प्रकरणांची मांडणी कशी असेल याचा उल्लेख प्रथम प्रकरणात करण्यात येणार आहे. सहकार कायदा १९०४ आणि त्यानंतर सहकार चळवळीची वाढ आणि विकास तसेच महत्त्वाच्या सहकार चळवळीतील नेतृत्वाची माहिती या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे– संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाची गृहितके आणि संशोधन आराखडा याबाबतचा आढावा घेण्यात येणार आहे. अभ्यासाचा हेतू निश्चित करून संशोधनासाठी निवडलेल्या तसेच नमुना अध्ययनासाठी वापरलेल्या संकल्पना, संशोधनाच्या मर्यादा तसेच संकलन पद्धती, अभ्यासाचे क्षेत्र, संशोधनाची उपयोगिता याबाबतचा प्रस्तुत प्रकरणात समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे– तात्यासाहेब कोरेंचे प्रारंभिक जीवन

तात्यासाहेब कोरेंचे बालपण त्यांच्यावरील संस्कार, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग, सहकाराची ओढ आणि सार्वजनिक कार्याच्या जीवनास सुरूवात याची माहिती या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे– तात्यासाहेब कोरेंची सहकारातील जडण–घडण

तात्यासाहेब कोरेंनी सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी घेतलेली भूमिका, वारणा खोऱ्याचा विकास करण्यासाठी सहकारातील महत्त्वाच्या नेतृत्वाबरोबर त्यांची जडण–घडण या संदर्भाने या प्रकरणात माहिती देण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे– तात्यासाहेब कोरेंनी वारणा खोऱ्याचा केलेला औद्योगिक विकास

या प्रकरणात तात्यासाहेब कोरेंनी वारणा विभाग शिक्षण व उद्योग समूहाच्या माध्यमातून सहकारातत्त्वारील साखर कारखाना, वारणा दूध संघ तसेच अनेक संस्थांच्या माध्यमातून वारणा खोऱ्याचा औद्योगिक विकास कसा करण्यात आला याची संपूर्ण माहिती या प्रकरणात देण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे–तात्यासाहेब कोरे आणि वारणा खोऱ्याचा सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास

तात्यासाहेब कोरेंनी अंगीकारलेला सहकारितेच्या तत्त्वामुळे वारणा खोऱ्याच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासास हातभार लागला. कोणते बदल घडून आले याची संपूर्ण माहिती या प्रकरणात देण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे– उपसंहार

या प्रकरणात वरील सर्व संशोधन कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे. परिशिष्ट्ये, छायाचित्रे, संदर्भ ग्रंथ सूची, प्राथमिक साधने, दुय्यम साधने यांची माहिती देण्यात येणार आहे. निष्कर्ष मांडणी करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) देव प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड

२) आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धती, शास्त्र व तंत्रे, रेणूका प्रिंटर्स, नागपूर

३) गणेश द. राऊत, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे

४) कायंदे पाटील गंगाधर वि., संशोधन पद्धती, रिप्लीका प्रिंटर्स, नाशिक

५) मी एक कार्यकर्ता, तात्यासाहेब कोरे षष्ठ्यब्दी कमिटी १९७४, पूर्वाध, उत्तरार्ध

६) आण्णासाहेब शिंदे, मा.वि.आ. तथा तात्यासाहेब कोरे ७५ अमृतमहोत्सव स्मरणिका १९९४, प्रकाशक स.आ. गुळवणी

७) नाडगोंडे गुरूनाथ, अमृतरंग, सन १९७४ ते १९८४ या दशकातील तात्यासाहेब कोरेंचा व्याख्यान संग्रह.

८) पाटील राम, सहकार वैभव, १६ ऑगस्ट १९६६, लेखसंग्रह

९) धवलक्रांती, श्री वारणा सह. दुध उत्पादक प्रक्रिया संघ, अमृतनगर, रौप्यमहोत्सवी स्मरणिका सन १९९१.

१०) वार्षिक विशेषांक

११) स्मरणिका

१२) तत्कालिन वृत्तपत्रीय माहिती

संशोधक विद्यार्थी

अजित एकनाथ पाटील

मार्गदर्शक

डॉ. नरेंद्र बाळासाहेब देशमुख

इतिहास विभागप्रमुख,
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय,
बाभळगाव, ता.जि. लातूर

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधकाचे नाव	–	**प्रा अजित एकनाथ पाटील** एम.ए.एम.एड, सेट.
विषयाचे नाव	–	इतिहास
संशोधन विषयाचे शिर्षक	–	**सहकार महर्षी तात्यासाहेब कोरे व्यक्ती आणि जीवनकार्य (१९१७ ते १९९४)**
मोबाईल नंबर	–	९६५७८४७११८
ईमेल आयडी	–	ajitpatil19682@gmail.com
कॅटेगरी	–	ओपन
संशोधन मार्गदर्शक	–	**प्रा. डॉ. नरेंद्र बी. देशमुख** सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभागप्रमुख, कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव ता. लातूर, जि. लातूर.
मोबाईल नंबर	–	९६८९६५८११०
ईमेल आयडी	–	
संशोधन केंद्र	–	ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे **कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी**
सन	–	२०२१–२०२२

प्रति, दि. २५/०३/२०२२

मा. उपकुलसचिव,

पदव्युत्तर विभाग,

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

विषय : संशोधक मार्गदर्शक म्हणून कार्य करणेस संमती असले बाबत व संशोधन आराखडा स्विकारणेबाबत....

महोदय,

वरील विषयी विनंती करण्यात येते की, **श्री. अजित एकनाथ पाटील** या संशोधक विद्यार्थ्यांने इतिहास विषयात **'सहकारमहर्षी तात्यासाहेब कोरे व्यक्ती आणि जीवन कार्य'** पीएच.डी. पदवीसाठी संशोधन मार्गदर्शक म्हणून कार्य करण्यास विनंती केली आहे.

त्यास माझी संमती आहे. त्याने निवडलेल्या विषयास माझी संमती आहे. तरी संशोधन आराखडा स्विकारावा, कृपया त्यास मान्यता देण्यात यावी, ही नम्र विनंती.

कळावे,

मार्गदर्शक
डॉ. नरेंद्र बाळासाहेब देशमुख
इतिहास विभागप्रमुख,
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय,
बाभळगाव, ता.जि. लातूर